**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**


# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**


**अंक ९६/२०१७** **दिनांक ३०/११/२०१७** **कालावधी ५ दिवस**



| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |


| **मागील हवामान सारांश दि. २६/११/२०१७ ते ३०/११/२०१७** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (०१/१२/२०१७ सकाळी ८:३० पासून ०५/१२/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | **०१/१२** | **०२/१२** | **०३/१२** | **०४/१२** | **०५/१२** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | २९ | २९ | २९ | २९ | २९ |
| किमान तापमान (अं.से) | : | १८ | १७ | १७ | १७ | १८ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ६ | ८ | ८ | ७ | ७ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५३ | ६३ | ५४ | ५२ | ५४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | २५ | २५ | २६ | २६ | २२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००७ | ००७ | ००७ | ००७ | ००७ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १ ते ५ डिसेंबर, २०१७ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक १ ते ५ डिसेंबर, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ७ किमी प्रति तास राहिल.**

| **पिक** | **पिक अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **आंबा, काजू** | **लागवड** | • जिल्हयामध्ये तुरळक ठिकाणी अवकाश मेघाच्छादित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आंबा बागांमध्ये तुडतुडयांचा प्रादुर्भाव होईल त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली. तसेच करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १२ टक्के +मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• आंब्यावरील फांदेमर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ०.३ टक्के (३० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा ०.१ टक्के यापैकी एका बुरशीनाशकाची फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठया फांद्यांमधून डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासून त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी. आंब्यामधे रोगट व सुकलेल्या फांडया, बांडगुळे कापून घ्यावीत व त्या ठिकाणी १ टक्का बोर्डो मिश्रण लावावे.<br>• काजूवर ढेकण्या (टी मॉस्किटो) चा प्रादूर्भाव होण्याची शक्यता आहे त्याच्या नियंत्रणासाठी प्रवाही प्रोफेनफॉस ५० टक्के १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून नवीन पालवी फुटण्याच्यावेळी फवारणी करावी.<br>• काजूवरील ढेकण्याचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी लॅमडा सायहेलोथ्रिन ५ टक्के ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. (सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.) |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळाच्या कोमकुजव्या रोगाच्या नियंत्रणासाठी कुजलेला कोम साफ करून त्यामध्ये १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून ओतावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला आणि कलिंगड लागवड** | | • रब्बी हंगामासाठी टोमॅटो, वांगी व मिरची यांची रोपे तयार करावीत.<br>• वांगी, मिरची व टोमॅटोच्या रोपांचे जीवाणूजन्य मर या रोगांपासून संरक्षण करण्याकरिता ज्या गादीवाफ्यावर बिया पेरावयाच्या आहेत त्या ठिकाणी पेरणीपूर्वी कॉपर ऑक्झीक्लोराइडचे २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून वाफ्यावर फवारणी करावी. तसेच वाफ्याच्या बाजून मुंग्यांच्या बंदोबस्तासाठी कार्बारील भुकटी किंवा लिंडेन भुकटी टाकावी. पेरणीपूर्वी १ किलो बियाण्यांस ३ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• कलिंगडाची लागवड करण्यासाठी जमिन नांगरून कुळवून लागवडीसाठी तयार करावी. लागवडीसाठी ४ मीटर अंतरावर पाट किंवा सऱ्या काढाव्यात. पाटाच्या दोन्ही बाजूस ९० सें.मी. अंतरावर ३० X ३० X ३० सें.मी. आकाराचे खड्डे करून त्यात १ ते १.५ किलो चांगले कुजलेले शेणखत व १० ग्रॅम कार्बारील (१०टक्के) पावडर मिसळून खड्डा भरून घ्यावा. प्रत्येक खड्ड्यात ३–४ बिया एकमेकापासून ४–५ सें.मी. अंतरावर व २ ते २.५ सें.मी. खोलीवर लावाव्यात रूजवा झाल्यानंतर १५ दिवसांनी रोपांची विरळणी करून प्रत्येक ठिकाणी २ चांगली जोमदार रोपे ठेवावीत. या पिकाला प्रती हेक्टरी १५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश याची मात्रा द्यावी. स्फुरद आणि पालाश याची संपुर्ण मात्रा व नत्राची १/३ मात्रा पेरणीच्या वेळेस द्यावी. उर्वरीत नत्राची मात्रा समप्रमाणत विभागून १ व २ महिन्यांनी लागवडीनंतर द्यावी. |
| **दुभती जनावरे/ शेळया** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• किमान तापमान कमी होत असल्यामुळे गुरांच्या गोठयात तसेच कोंबडयाच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्प आणि शेडभोवती पडदे गुडांळावेत. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |